# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांकः२/ एनजीसी/तक्रार/२०१० /२३५८
दिनांक : 4 NOV 2010

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती व नागपूर.

विषय -- संस्थेचे नाव बदलणे / संस्था बंद करणे व स्थलांतर तसेच संस्था हस्तांतरण इ.बाबत

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून ॲप्रुवल प्रोसेस हँड बुक प्रसिध्द केलेअसून त्यातील तरतूदीनुसार व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी वरील विषयास अनुसरुन प्रस्ताव आवश्यक कागदपत्रासह अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे ऑनलाईन विहित शुल्क भरुन विहीत प्रपत्रात जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणेसुध्दाआवश्यक आहे. त्याकरीता आपल्या विभागातील सर्व संबंधित संस्थांना वरील ॲप्रुवल प्रोसेस हँड बुक मधील तरतूदीनुसार प्रस्ताव सादर करणे बंधनकारकआहे व तद्नंतर त्यांची प्रत या संचालनालयास विहीत मुदतीत सादर करण्यास कळविण्यात यावे. जेणेकरुन सदर प्रस्तावाबाबत तपासणी करुन शासनास या संचालनालयाचे अभिप्राय सादर करणे व शासनामार्फत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस शिफारस करणे सुलभ होईल.

( डॉ.सु. का. महाजन)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

*****************************************************************

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा/२०१०/ १९९३
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
दिनांक 1 DEC 2010

प्रति,
संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र /एचएमसीटी अभ्यासक्रम,
पदविका व पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
नाशिक विभाग

२/- त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनेप्रमाणे नोंद घेउन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(दि.रा.नंदनवार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक
२/- सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.